महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

राज्यातील नवीन वैद्यकीय महाविद्यालयांना
शासकीय खर्चातून मान्यता देणेबाबत

(१) ३२२३१ (०५-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १९ नवीन महाविद्यालये व बुलढाणा येथील नविन वैद्यकीय महाविद्यालय खासगी भागीदारीतून स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याची माहिती दिनांक १० मार्च २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच, बुलढाणा येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नविन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित ४३० खाटांचे रुग्णालय स्थापन करण्याबाबत राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या निकषानुसार आवश्यक मनुष्यवळ, बांधकाम, यंत्रसामुग्री, अनावर्ती व आवर्ती खर्चाचा शासनास सादर केलेला यापुर्वीचा प्रस्ताव परिपुर्ण नसल्याने संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना परिपुर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने निर्धारीत केलेल्या मापदंडानुसार बुलढाणा येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नविन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ४३० रुग्णखाटांचे संलग्नित रुग्णालय निर्माण करण्याबाबतचा सुधारीत प्रस्ताव संचालनालयाने दिनांक १० मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास शासनास सादर केला असून सदर प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर मान्यतेसाठी सादर करायच्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभागास अभिप्रायार्थ पाठविण्यात आला असुन दिनांक १० जून २०२१ रोजी पर्यंत सार्वजनिक आरोग्य विभागाकडून अभिप्राय अप्राप्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बुलडाणा वैद्यकीय महाविद्यालयासाठी सकारात्मक अहवाल देण्यात यावा तसेच खासगी भागीदारीतून बुलडाणा व इतर वैद्यकीय महाविद्यालय स्थापन न करता शासकीय खर्चातून करण्यासाठी शिफारस करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सार्वजनिक आरोग्य मंत्री व वैद्यकीय शिक्षण मंत्री यांच्याकडे दिनांक ११ जून, २०२१ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्राव्दारे केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अमित विलासराव देशमुख (१७-०२-२०२२) : (१) होय, हे अंशत: खरे आहे.

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचा शासन निर्णय दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ अन्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय स्थापन करण्याकरीता सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP) धोरण अवलंबण्यास मान्यता प्रदान केली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सदर पत्र अद्याप अप्राप्त आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

'राजर्षी शाहू महाराज परदेशी शिष्यवृत्ती' योजनेच्या रकमेत वाढ करण्याबाबत

(२) ३२४०४ (१५-०९-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांना परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये उच्चशिक्षण घेता यावे, यासाठी 'राजर्षी शाहू महाराज परदेशी शिष्यवृत्ती' योजना लागू केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू योजनेंतर्गत विदेशात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सद्य:स्थितीत बँकांचे कमिशन, जीएसटी आणि परदेशी चलनाचा दर यामुळे मंजूर रकमेपेक्षा कमी पैसे मिळत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व सदरहू योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या रकमेत वाढ करण्याबाबत शासनाने कोणता ठोस निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

श्री. धनंजय मुंडे (०३-०३-२०२२) : (१) हे खरे आहे
(२) आणि (३) विनिमय दरामध्ये होणारी चढउतार व भारतीय तथा परदेशातील बँकेचे कमीशन, वस्तू व सेवा कर यामुळे काही प्रकरणांमध्ये प्रत्यक्षात मंजूर रकमेपेक्षा विद्यार्थ्यास तसेच त्याचे विद्यापिठास कमी प्रमाणात रक्कम प्राप्त झाल्याचे आढळून आले आहे. तद्नंतर ताळमेळ घेवून फरकाची रक्कम पुनश्च मंजुर करण्यात येऊन संबंधित विद्यार्थी व विद्यापिठास अदा करण्यात येते
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य शासनाच्या २९ प्रमुख विभागांतील सरळसेवा व पदोन्न्तीच्या
रिक्त जागा भरण्याबाबत

(३) ३२७६३ (०५-०१-२०२२). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या २९ प्रमुख विभागांमध्ये सरळसेवा व पदोन्नतीच्या मिळून एकूण २ लाख १९३ जागा रिक्त असल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये ४६ हजार ९६२ जागा जिल्हा परिषदांमधील आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्वाधिक २४ हजार ८७८ रिक्त जागा या गृह विभागात असून जलसंपदा विभागात २० हजार ८७३ तर सार्वजनिक बांधकाम विभागात २० हजार ५४४ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात बेरोजगारी प्रचंड वाढली असून तरुणांना नोकऱ्यांची प्रतिक्षा आहे परंतु नव्या नोकरभरतीऐवजी आउटसोर्सिंग, कंत्राटी पध्दतीवर शासनाचा अधिक जोर असून निवृत्तांना पुन्हा कंत्राटी तत्वांवर सेवेत सामावून घेतले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, सदर चौकशीअंती रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. अजित पवार (११-०३-२०२२) : (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे. माहे डिसेंबर, २०१९ अखेरच्या उपलब्ध आकडेवारीनुसार शासकीय आणि जिल्हापरिषद कार्यालयांमधील गट अ, ब, क व ड या संवर्गातील अंदाजे २,००,१९३ इतकी पदे रिक्त आहेत. त्यापैकी ४६,९६२ इतकी रिक्त पदे जिल्हा परिषदांमधील असून १,५३,२३१ रिक्त पदे शासकीय कार्यालयांतील आहेत. तसेच सदर आकडेवारीनुसार गृह विभागात २४,८४८, जलसंपदा विभागात २०८७३ व सार्वजनिक बांधकाम विभागात ८६२८ पदे रिक्त आहेत.

(४) नाही. नियमित मंजूर पदे सेवाप्रवेश नियमानुसार विहित मार्गानेच भरण्यात येतात. करार पध्दतीने सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या करण्यात येणाऱ्या नियुक्त्या ह्या केवळ विवक्षित स्वरुपाच्या कामासाठी आणि अल्प कालावधीसाठी करण्यात येतात. तसेच कार्यालयातील जी कामे सहजरित्या बाहेरुन करुन घेणे शक्य आहे अशी कामे बाहययंत्रणेकडून (outsourcing द्वारे) करुन घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) वित्त विभागाच्या दि.१६.०५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये शेतकऱ्यांना सुविधा पुरविण्यासाठी महत्त्वाच्या सेवेशी निगडित असलेली रिक्त पदे भरण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. तसेच, विविध विभागांच्या पदांच्या आवश्यकतेनुसार रिक्त पदे भरण्यास दि. ९.६.२०१७ च्या शासन निर्णयान्वये गठित उपसमितीमार्फत मान्यता देण्यात येते. वित्त विभागाच्या दि.३०.७.२०२१ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील १०० टक्के रिक्त

पदे भरता यावीत याकरीता वित्त विभागाच्या विविध शासन निर्णयान्वये पदभरतीवर घातलेल्या निर्बंधांमधून सुट देण्यात आली आहे. त्यानुसार रिक्त पदे भरण्याची कार्यवाही संबंधित प्रशासकीय विभागांकडून करण्यात येते.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात वीज टंचाई निर्माण झाल्याबाबत

(४) ३२७८५ (१२-०१-२०२२). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात निर्माण झालेल्या कोळसा टंचाईमुळे "महावीज" तर्फे कोयना जलविदयुत केंद्र व उरण वायू विदयुत केंद्रातून वीजनिर्मिती करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात वीज टंचाई निर्माण होऊ नये म्हणून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. नितिन राऊत (०४-०३-२०२२) : (१) महानिर्मितीच्या औष्णिक वीज केंद्रांना माहे सप्टेंबर-२०२१ व ऑक्टोबर, २०२१ या कालावधीत नियोजित कोळश्याच्या आवश्यकतेपेक्षा अपुरा कोळसा पुरवठा झाल्यामुळे राज्याच्या वीज ग्रीड प्रणालीची वीजेची गरज पूर्ण करण्याकरिता उरण वायू वीज निर्मिती केन्द्र, कोयना जलविद्‌युत केन्द्र व इतर लहान जलविद्‌युत केन्द्र यांच्यामधून वीज निर्मिती करण्यात आली.
(२) महानिर्मिती कंपनी व राज्य शासनाकडून कोल इंडिया लि., केन्द्रीय विद्‌युत प्राधिकरण व केन्द्रीय कोळसा मंत्रालय यांचेबरोबर उच्च पातळीवर बैठका घेऊन कोळसा उपलब्धतेबाबत पाठपुरावा, इतर पर्याय वीज निर्मिती केन्द्रातून वीजनिर्मिती महावितरणव्दारा खुल्या बाजारातून वीज खरेदी इ. च्या माध्यमातून वीजेच्या मागणीएवढा पुरवठा करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्य सफाई कामगार आयोगाचे अध्यक्ष पद तसेच
इतर रिक्त पदे भरण्याबाबत

(५) ३२८८६ (१२-०१-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य सफाई कामगार आयोगाचे अध्यक्ष पद तसेच इतर अनेक पदे रिक्त असल्याचे दिनांक १ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे राज्यातील सफाई कामगारांसाठी असलेल्या केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशीच्या अनुषंगाने शासनाने माहिती घेऊन सदरहू आयोगाचे अध्यक्ष पद व इतर रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. धनंजय मुंडे (०७-०४-२०२२) : (१) होय. खरे आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष-१ / उपाध्यक्ष-१ व सदस्यांच्या पाच (५) जागा रिक्त असून आयोगावरील रिक्त असलेल्या अध्यक्ष व सदस्य पदावर नियुक्तीसाठी नामनिर्देशनाबाबत आदेश होणेबाबत स्वतंत्र नस्तीवर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील महिला व बालविकास विभागातील जिल्हा परिविक्षा अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांना "गट-ब" राजपत्रीत पदाचा दर्जा देणेबाबतचा

(६) ३२९५९ (०६-०१-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महिला व बालविकास विभागातील जिल्हा परिविक्षा अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांना "गट-ब" राजपत्रीत पदाचा दर्जा देणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून याबाबत महिला व बालविकास मंत्री व प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांचेकडे लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात जिल्हा परिविक्षा अधिकारी व तत्सम संवर्गातील एकूण ६१ पदे गट-क ६ व्या वेतन आयोगाच्या वेतन श्रेणीनुसार व ७ वा वेतन आयोगाच्या एस १६ स्तरामध्ये आहेत याबाबत सदरील सर्व पदे राजपत्रीत गट-ब करण्यास संघटनेची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, सदरहू बदल केल्यानंतर राज्य शासनावर अतिरिक्त कोणतीही भार पडणार नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (१८-०४-२०२२) : (१), (२) व (३) होय.
(४) कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

करंबळी (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) येथील कोल्हापूर पध्दतीचा बंधारा नादुरुस्त असल्याबाबत

(७) ३२९८९ (०५-०१-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करंबळी (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) येथील कोल्हापूर पध्दतीचा बंधारा गेल्या १० ते १२ वर्षापासून नादुरूस्त अवस्थेत असून या परीसरातील २० ते २५ खेड्यांचा दळणवळणाचा प्रश्न गंभीर झाल्याने या ठिकाणी नवीन केटीवेअर उभारण्याकरीता मा.स्थानिक लोकप्रतिनीधी यांचा जलसंपदा विभागाकडे सातत्याने पाठपुरावा सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत रुपये ७ कोटी ७१ लक्ष रुपयांचा प्रस्ताव अधिक्षक अभियंता पाटबंधारे विभाग, कोल्हापूर यांचेकडून कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचेमार्फत शासनास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू केटीवेअर करीता शासनाने निधीची तरतूद देण्याबाबत मा.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व जलसंपदा मंत्री महोदय यांचेकडे दिनांक १८ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१०-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे,

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) करंबळी को.प.बंधारा सुधारित प्रशासकीय मान्यतेबाबतची कार्यवाही शासन स्तरावर प्रगतीपथावर आहे

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

कुमठा (बु.) ते कौडगाव (ता.अहमदपूर,जि.लातूर) रस्त्याचे काम निकृष्ट केल्याबाबत

(८) ३३१२८ (११-०१-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील अहमदपूर तालुक्यातील कुमठा (बु.) ते कौडगाव रस्त्याचे काम गेल्या ६ महिन्यांपासून करण्यात येत असल्याचे दिनांक २२ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे कामात सिमेंट पाईप टाकण्याचे नियोजन असतांना, सदर रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असल्याचे तसेच कुमठा येथील पुल अरुंद असल्यामुळे त्यावरुन ऊसाच्या गाडया व ट्रॅक्टर व अन्य वाहतुक होत असल्यामुळे पुल धोकादायक स्थितीत आला असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी शासनाकडे केल्या असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याचे कामात सुधारणा करण्याऐवजी संबंधित अभियंता यांनी ते कामच बंद करण्याची धमकी ग्रामस्थांना दिली असल्याचेही निदर्शनास आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रस्त्यावरुन तसेच पुलावरुन होणारी वाहतूक विचारात घेऊन रस्त्याच्या अरुंद पुलाचे कामात सुधारणा करण्यात यावी अशी ग्रामस्थांनी केलेल्या मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. हसन मुश्रीफ (०९-०३-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.

सदर रस्त्याचे काम दिनांक ३० जून, २०२१ रोजी पुर्ण झाले आहे.

(२) सदर रस्त्याच्या कामात दोन नळकांडी पुलांचा समावेश होता व त्यानुसार दोन्ही नळकांडी पुलाचे काम पुर्ण झाले आहे. सदर रस्त्याचे काम पुर्ण झालेले असून सदर रस्त्यावर विविध स्तरावर राज्य गुणवत्ता निरिक्षक व वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरिक्षक यांच्याकडून तपासणी झाली असून तपासणीअंती समाधानकारक शेरे प्राप्त आहेत.
(३), (४) व (५) सदर रस्त्याचे काम बंद करण्याची धमकी संबंधित अभियंता यांनी ग्रामस्थांना दिली, हे खरे नाही. सदर रस्त्याच्या दर्जानुसार पुलाची रूंदी ठेवण्यात आली असून सदरील रस्त्यावरून व नळकांडी पुलावरून वाहतूक सुव्यवस्थित सुरू आहे.

मंडणगड तालुक्यातील (जि.रत्नागिरी) पणदेरी धरण फुटल्यामुळे धरणाचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याबाबत

(९) ३३२४७ (०५-०१-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंडणगड तालुक्यातील (जि.रत्नागिरी) पणदेरी धरण फुटल्यामुळे धरणाचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पणदेरी धरणाच्या दुरुस्तीचे काम त्वरीत हाती घेण्याबाबत सातत्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे पाठपुरावा करुनही अदयाप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पणदेरी धरणास त्वरीत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत व दुरुस्तीचे काम हाती घेण्याबाबत व शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. जयंत पाटील (१०-०३-२०२२) : (१) नाही,

तथापि, पणदेरी धरणाचा सा.क्र.०/५५ मी. येथील मुख्य विमोचकानजीक खड्डा पडून माती भराव खचल्याने गळती सुरू झाल्याचे निदर्शनास आले.

(२) नाही.

पणदेरी धरणाच्या खचलेल्या भरावाची दुरूस्ती तातडीने पूर्ण करून गळती थांबविण्यात आली आहे.
(३) पणदेरी धरणाचे धरण दुरूस्ती व गळती प्रतिबंधक उपाययोजनेचे विशेष दुरूस्ती अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सांगवारी उपसा सिंचन योजनेला (ता. जि. भंडारा) प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत

(१०) ३३२५१ (०५-०१-२०२२). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मध्यप्रदेशातील पेंच नदीवर चौराई धरणामुळे नागपूर जिल्ह्यातील पेच प्रकल्पाच्या पाणी साठ्यात व सिंचनात झालेली घट यामुळे उद्भवलेल्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी सांगवारी उपसा सिंचन योजना मंजूर करणे नितांत गरजेचे असल्याने तसेच पेंच प्रकल्पावर अवलंबून असलेल्या भंडारा जिल्ह्यातील काही तालुक्यांना पाणी टंचाई व शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळावे गोसेखुर्द प्रकल्पावर उपसा सिंचन योजना अंतर्भूत करून भंडारा जिल्ह्यातील २९ गावांना पाणी मिळावे त्यासाठी अंदाजित प्रकल्प किंमत १४२.३२ कोटी रुपयांचा प्रस्ताव मंजुरीसाठी शासनाला कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर यांनी दिनांक ०२ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास अप्पर मुख्य सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय मुंबई यांना सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सांगवारी उपसा सिंचन योजना (ता.जि.भंडारा) मंजुरीसाठी स्थानिक लोकप्रतिनिधीद्वारे सिंचना करिता पाणी वेळेत मिळत नसल्याने सिंचन व्यवस्थापन करणे अत्यंत अडचणीचे होणे, प्रसंगी पिके प्रभावित होऊन लोकप्रतिनिधी शेतकऱ्यांच्या रोषाला समोरे जावे लागते. यामुळे तातडीने सांगवारी उपसा सिंचन योजन मंजूर होऊन जिल्ह्यातील २९ गावांचे ७०३१ हेक्टर क्षेत्रास लाभ मिळावा यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रशासकीय मान्यता व निधी मंजुरीसाठी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांना दिनांक १७ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक १७ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मुंबई. यांना तपासून प्रस्ताव सादर करावे असे निर्देश देऊन उक्त प्रकरणी शासनाने तातडीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (०१-०४-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.

प्राथमिक अभ्यासाप्रमाणे सांगवारी उपसा सिंचन योजनेची प्रकल्पीय किंमत रू. १४२.३२ कोटी येत आहे. सदर योजनेचे सर्वेक्षण, अन्वेषण करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेच्या कामाची अंदाजपत्रकीय किंमत रू. ४.२७ कोटी असून त्यास प्रशासकीय मान्यता

प्रदान करणेच्या अनुषंगाने कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचेकडून शासनास प्रस्ताव प्राप्त झाला आहे. तथापि, शासन निर्णय दि. २३/११/२०१६ मधील निदेशाचे अनुषंगाने २००० हेक्टर वरील उपसा सिंचन योजना शासकीय खर्चाने हाती घेणेस मा. मुख्यमंत्री यांची मान्यता आवश्यक आहे. त्यानुसार, कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे दि.०२.०३.२०२१ चे पत्रान्वये सांगवारी उपसा सिंचन योजनेस मा.मुख्यमंत्री यांची मान्यता घेणेबाबत शेरे पूर्तता अहवाल / अभिप्राय प्राप्त झाले आहे.
(२) अंशत: खरे आहे.

मा. आमदार नरेंद्र भोंडेकर, ६१ - भंडारा विधानसभा क्षेत्र यांचे दि. १५/१२/२०२० रोजीचे सांगवारी उपसा सिंचन योजना ता. जि. भंडारा सविस्तर सर्वेक्षण, संकल्पन करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व प्रकल्पास लागणा-या वैधानिक मान्यता देण्याच्या कामाकरिता नेमलेल्या वॅप्कोसचे सल्लामसलत शुल्क देय कारणास्तव प्रशासकीय मान्यता प्रस्ताव मंजूर करणेबाबत व सर्वेक्षण कामास निधी उपलब्ध करून काम सुरू करण्याची परवानगी देण्याबाबत निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.
(३) सांगवारी उपसा सिंचन योजनेव्दारे २९ गावातील ७०३१ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ देणे प्रस्तावित आहे. शासन निर्णय दि.२३.११.२०१६ अन्वये नवीन शासकीय उपसा सिंचन योजनांचे प्रकल्प अहवाल तयार करणेबाबत निर्गमित मार्गदर्शक सुचनांनुसार २००० हेक्टर वरील नवीन उपसा सिंचन योजना शासकीय खर्चाने मान्यता देण्याबाबतचे अधिकार मा. मुख्यमंत्री यांना आहेत. कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांनी सदर योजना दुष्काळ निवारणार्थ कार्यक्रमांतर्गत प्रस्तावित केली आहे. तथापि, महसूल व वन विभागाने सदर योजनेचा दुष्काळ निवारण कार्यक्रमात समावेश नसल्याने जलसंपदा विभागाने त्यांचे निधीतून सदर योजना हाती घ्यावी असे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार वित्त विभागाचे सहमतीने मा. मुख्यमंत्री यांची मान्यता घेणेबाबतची कार्यवाही प्रगतिपथावर आहे. सदर मान्यता प्राप्त झाल्यानंतरच पुढील कार्यवाही करणे शक्य आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अड्याळ गावास (ता. पवनी जि. भंडारा) तालुक्याचा दर्जा मिळण्याबाबत

(११) ३३२५४ (०७-०१-२०२२). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अड्याळ (जि.भंडारा) येथील नागरिकांना वैयक्तीक कामांसाठी अड्याळ ते पवनी तालुक्याच्या ठिकाणचे अंतर अंदाजे २५ कि. मी. गाठावे लागत असल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्यामुळे सन २००३ या वर्षापासुन नागरिकांनी अडयाळ या गावाला तालुक्याचा दर्जा देण्याबाबत लोकप्रतिनिधींना वांरवार मागणी करुन तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ३१ जुलै, २००३ व १६ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, सन २०११ च्या जणगणनेनुसार अडयाळ या गावात सुमारे १५४५८८ लक्ष लोकसंख्या असून एकूण ग्रामपंचायती ७९ आहेत, त्यानुसार स्थानिक लोकप्रतिनिधीनी अड्याळ

गावास तालुक्याचा दर्जाबाबत मा. मुख्यमंत्री यांना दिनांक ०५ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली काय, चौकशीच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्याचे निर्देष संबंधित यंत्रणेला दिले आहेत काय, अद्यापपर्यंत अहवाल सादर केला नसल्यास दिरंगाईची सर्वसाधारण कारणे कोणती आहेत,
(४) असल्यास, अडयाळ गावाला तालुक्याचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव संबंधित यंत्रणेने सादर केला असल्यास शासनाने सदर प्रस्ताव मंजुरीस्तव कोणता निर्णय घेतला आहे वा प्रस्ताव मंजुर करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (०४-०३-२०२२) : (१), (२), (३) व (४) अडयाळ तालुक्याची निर्मिती करण्याबाबत शासनास निवेदन प्राप्त झालेले आहे.

तालुका निर्मिती ही एक मोठी प्रशासकीय व आर्थिक प्रक्रिया आहे. त्याअनुषंगाने विविध पैलू तपासून त्यासंदर्भात धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मितीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मिरा-भाईंदर (जि.ठाणे) शहरास तालुक्याचा स्वतंत्र दर्जा देण्याबाबत

(१२) ३३३६५ (०७-०१-२०२२). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरा-भाईंदर (जि.ठाणे) शहराची लोकसंख्या अंदाजे १७ लाख झाली असूनही मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी स्वतंत्र तालुक्याची निर्मिती झाली नसल्यामुळे तहसिल कार्यालय तसेच अनेक इतर शासकीय कार्यालयाची निर्मिती होऊ शकली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे शासकीय कामासाठी मिरा-भाईंदर शहर वासियांना २५-३० किलोमीटर अंतर पार करून ठाणे तहसीलदार कार्यालयात जावे लागत असल्यामुळे मिरा भाईंदर शहरास स्वतंत्र तालुक्याचा दर्जा देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने मिरा-भाईंदर शहरास तालुक्याचा दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (०९-०३-२०२२) : (१), (२) व (३) होय,

तालुका निर्मिती ही एक मोठी प्रशासकीय व आर्थिक प्रक्रिया असून अत्यंत क्लिष्ट व खर्चिक बाब आहे. त्याअनुषंगाने विविध पैलू तपासून त्यासंदर्भात धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मितीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

तथापि, प्रशासकीय कामातील सोयीच्या तसेच शासकिय योजनांची प्रभावी अमलबजावणी करण्याच्या दृष्टीने मिरा-भाईदर येथे दि. ०९ सप्टेंबर, २०१९ च्या शासन निर्णयान्वये अप्पर तहसिलदार कार्यालयाची निर्मिती करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

महावितरणाची पथदिव्यांची देयके ग्रामपंचायत ऐवजी शासनाकडून अदा करण्याबाबत

(१३) ३३४५३ (०६-०१-२०२२). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महावितरण कडून गावात पथदिव्यांची योजना ग्रामपंचायत हद्दीत राबविली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पथदिव्यांची देयके ही दोन वर्षा पूर्वी जिल्हा परिषदेकडून ग्रामपंचायतीस अनुदान मिळत होते व ते अनुदान ग्रामपंचायतीकडून महावितरणाकडे भरण्यात येत होते, परंतु गेली दोन वर्षापासून ग्रामपंचायतीकडून बिले थकबाकी असल्यामुळे नवीन पथदिव्यांची योजना बंद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, शासनाने १५ वित्त आयोगातून पाणीपुरवठा व स्ट्रीट लाईट ची देयके भरण्याकरिता परवानगी दिली होती, परंतु १५ वित्त आयोगातील निधी खर्च करण्याच्या संगणक प्रणाली मध्ये कुठल्याही प्रकारचा बदल न केल्यामुळे १५ वित्त आयोगातून विद्युत देयके भरता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) त्याचप्रमाणे, पथदिव्यांची योजना सुरु करणेबाबत तसेच पथदिव्यांची थकीत देयके ही शासनाकडून भरण्याची मागणी ग्रामपंचायतींकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुषंगाने राज्यातील पथदिव्यांची व पाणीपुरवठाच्या देयकांबाबतची थकबाकी भरण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबत शासनाची भूमिका तसेच सद्य:स्थिती काय आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०९-०३-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे अंशत: खरे आहे.

१५ व्या वित्त आयोगाच्या अबंधित अनुदानातून पथदिव्यांची वीज देयके आणि बंधित अनुदानातून पाणी पुरवठा योजनांची वीज देयके अदा करण्यास परवानगी देण्यात आली आहे. निधी खर्च करताना संगणक प्रणालीमध्ये अडचणी येत असल्याची बाब जिल्हा परिषदांकडून निदर्शनास आणून देण्यात आली असून त्याअनुषंगाने आवश्यक बदल करण्यात येत आहेत.
(४) हे अंशत: खरे आहे.

(५) ग्रामपंचायतींच्या हद्दीतील रस्त्यांवरील पथदिव्याचे विद्युत देयकाची रक्कम महावितरणला अदा करण्यासाठी ग्रामविकास विभाग, शासन ज्ञापन दिनांक १५.११.२०२१ अन्वये रुपये १७१ कोटी इतका निधी जिल्हा परिषदांना वितरित करण्यात आला आहे.

पाणीपुरवठा योजनांच्या विद्युत देयकाची रक्कम ग्रामपंचायतीनी पाणीपट्टी व स्वउत्पनातून भरणे अपेक्षित आहे. तथापि स्वउत्पन्नातूनही विद्युत देयकांची रक्कम भागविणे शक्य न झाल्यास १५ व्या वित्त आयोगाच्या बंधित अनुदानातून पाणी पुरवठा योजनांची वीज देयके अदा करण्यास शासनाने ग्रामपंचायतींना परवानगी दिली आहे.

(६) लागू नाही.

मिरा-भाईंदर (जि.ठाणे) येथे औद्योगिक क्षेत्र विकसीत करणेबाबत

(१४) ३३७५३ (१२-०१-२०२२). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर (जि. ठाणे) येथे विशेष औद्योगिक क्षेत्राची निर्मिती करणे शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,

(२) मिरा-भाईंदरची वाढती लोकसंख्या लक्षात घेता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास उद्योग आणि खनिकर्म मंत्री यांच्याकडे निवेदनामार्फत विशेष औद्योगिक क्षेत्राची निर्मिती करण्याची मागणी केलेली आहे, हे खरे आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून मिरा-भाईंदर शहरात विशेष इंडस्ट्रीयल झोनची निर्मिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (११-०३-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मिरा- भाईंदर (जि. ठाणे) येथे औद्योगिक क्षेत्र विकसीत करण्यासाठी सुयोग्य जागा उपलब्ध आहे किंवा कसे, याबाबतची तपासणी म.औ.वि. महामंडळाच्या स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

भडगांव (जि. जळगांव) तालुक्यातील गिरणा नदीवरील वरखेडे-लोंढे प्रकल्पाचा कालवा पूर्णपणे बंदिस्त करण्याबाबत

(१५) ३३७७२ (०५-०१-२०२२). श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडगांव तालुक्यातील (जि. जळगांव) गिरणा नदीवरील वरखेडे-लोंढे प्रकल्पाचा कालवा पूर्णपणे बंदिस्त न करता ३८ कि.मी. पैकी फक्त सुरवातीचा ११ कि.मी.चा कालवा बंदिस्त

करायचा आणि उर्वरित पारंपारिक पध्दतीने करण्याचा निर्णय विभागाने घेतल्याचा माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आहे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात कालव्याद्वारे पाण्याचे अपव्यय होण्याचे सर्वाधिक प्रमाण गिरणापट्ट्यात होत असल्याने तो पारंपारिक पध्दतीने न करता पूर्णपणे बंदिस्त कालवा केल्यास जवळपास ११० कोटीची बचत होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदर्शनास आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त कालव्याद्वारे होणारा पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी कालव्याचे काम पारंपारिक पध्दतीने न करता पूर्णपणे बंदिस्त करण्याबाबत तसेच उक्त कालव्याकरीता होणारा जादा खर्च टाळण्याकरिता शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (२४-०३-२०२२) : (१) नाही. मूळ मंजूर प्र.मा मध्ये संपूर्ण कालवा पारंपारिक पद्धतीचा प्रस्तावित आहे. तथापि भौगोलिक परिस्थिती व भूसंपादनाचा मोठा खर्च टाळण्यासाठी बंदिस्त कालवे प्रणालीची तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता पडताळणीसाठी तुलनात्मक अभ्यास क्षेत्रीय स्तरावर करण्यात येत आहे.

(२) बंदिस्त कालवा वितरण प्रणालीच्या तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यतेचा अभ्यास क्षेत्रीय स्तरावर करण्यात येत आहे.

(३) क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) सदर ठिकाणी पारंपारिक कालव्यांसाठी आवश्यक असणारे भूसंपादन करण्यात आलेले नाही. त्यामुळे शासन धोरणानुसार बंदिस्त वितरण प्रणाली व पारंपारिक वितरण प्रणाली यांचा तुलनात्मक अभ्यास करुन तांत्रिक व आर्थिक दृष्ट्या किफायतशीर पर्यायाचा विचार केला जाणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

वरोरा व भद्रावती (जि.चंद्रपूर) शहरात कामगार भवन मंजूर करण्याबाबत

(१६) ३३७९० (०५-०१-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा व भद्रावती (जि.चंद्रपूर) शहरात मोठया प्रमाणात उद्योग व कोळसाखाणी आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामध्ये संघटीत व असंघटीत काम करणाऱ्या कामगारांसाठी येथे कामगारभवन मंजूर करावे अशी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास राज्यमंत्री, कामगार कल्याण यांच्याकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने उक्त ठिकाणी कामगार भवन होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१३-०४-२०२२) : (१) वरोरा व भद्रावती या दोन तालुक्यातील विविध १०१ आस्थापना कामगार कल्याण मंडळाकडे नोंदित असून त्यापैकी २ कोळसा खाणी आहेत. सदर १०१ आस्थापनांमध्ये ७६५६ कामगार कार्यरत आहेत.
(२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दिनांक २०/०३/२०२१ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे.
(३) कामगार कल्याण मंडळाकडे नोंदीत १०१ आस्थापनांपैकी वरोरा तालुक्यातील ८५ आस्थापना असून त्यामध्ये ७५१६ कामगार तर भद्रावती तालुक्यातील १६ आस्थापना असून त्यामध्ये १४० कामगार कार्यरत आहेत. मंडळाचे कामगार कल्याण भवन चंद्रपूर येथे कार्यरत असून, या भवनापासून भद्रावती व वरोरा या शहरांचे अंतर अनुक्रमे १९ व ५८ कि.मी. आहे. सदरहू दोन्ही शहरात कामगार भवन उभारण्यासाठी पुरेशी कामगार संख्या नसल्याने तसेच सदर शहरातील पात्र कामगारांना मंडळाच्या सर्व योजनांचे लाभ ऑनलाईन पध्दतीने देण्यात येत असल्यामुळे, या दोन्ही ठिकाणी कामगार भवन सुरु करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील कोरोनाच्या तिसऱ्या लाटेसाठी आरोग्यसेवा सज्ज ठेवण्याबाबत

(१७) ३३९०८ (१०-०१-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याला कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचा शक्यता वर्तविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे राज्यातील आरोग्य यंत्रणेत बेडची संख्या, ऑक्सिजन इ. आरोग्यसेवा सुविधा सज्ज ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१७-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
जागतिक आरोग्य संघटना आणि भारत सरकारच्या सार्वजनिक आरोग्य विषयक तज्ञांनी भारतात आणि महाराष्ट्रात कोवीड-१९ आजाराची तिसरी लाट येण्याबाबतचा अंदाज वर्तविला आहे.

(२) तिसऱ्या लाटेची शक्यता गृहित धरुन भारत सरकारने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार काही पायाभूत गृहितकांच्या आधारे राज्यात तिसऱ्या लाटेमध्ये दुसऱ्या लाटेच्या तुलनेत दिडपट (१.५ पट) रूग्ण आढळतील अशी शक्यता गृहित धरुन राज्यातील आरोग्य यंत्रनेत बेडची संख्या, ऑक्सीजन इ. आरोग्य सुविधा सज्ज ठेवण्याबाबत शासनाने सर्वांगीण तयारी केली आहे.

• तिसऱ्या लाटेमध्ये एकूण कोवीड-१९ रूग्णांपैकी ६५ % रूग्ण हे घरगुती विलगीकरणात व ३५ % रुग्णांना रुग्णालयामध्ये भरती करण्याची आवश्यकता भासेल या ३५ % रुग्णांपैकी निम्मे रुग्ण खाजगी रुग्णालयामध्ये उपचार घेतील तर निम्मे रुग्ण सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये उपचार घेतील, या गृहितकानुसार सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये उपचार घेण्याची गरज भासणाऱ्या रुग्णांच्या बाबतीत पुढील नियोजन करण्यात येत आहे -

अ) सार्वजनिक आरोग्य संस्थांमधील कोविड-१९ रुग्णसंख्येच्या ८% रुग्णांसाठी समर्पित कोविड रुग्णालयामध्ये (डीसीएच) आयसीयु बेड्स (यापैकी निम्मे व्हेंटीलेटर व निम्मे नॉन व्हंटीलेटर बेड्स) तसेच ८% ऑक्सीजन बेड्स उपलब्ध करण्यात येतील.

आ) सार्वजनिक आरोग्य संस्थांमधील कोविड-१९ रुग्णसंख्येच्या २४% ऑक्सीजन बेड्स व १०% सर्वसाधारण बेड्स समर्पित कोविड आरोग्य केंद्रात (डीसीएचसी) मध्ये उपलब्ध करण्यत येतील तर समर्पित कोविड निगा केंद्रात (डीसीसीसी) मध्ये ५०% सर्वसाधारण बेड्स उपलब्ध करण्यात येतील. अशा प्रकारे सार्वजनिक आरोग्य संस्थामधील १००% कोविड-१९ रुग्णांसाठी आवश्यकतेनुसार बेड्स उपलब्ध होतील याची दक्षता घेण्यात आलेली आहे

इ) तिसऱ्या लाटेमध्ये लहान मुलांचे प्रमाण लक्षणीय असेल असा काही तज्ञांचा अंदाज लक्षात घेता लहान मुलांकरीता काही खाटा आरक्षित करण्यात येतील. समर्पित कोविड रुग्णालयामध्ये ५% आणि समर्पित कोविड निगा केंद्रामध्ये १५% खाटा लहान मुलांकरीता राखीव ठेवण्यात येतील.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील शासकीय आश्रमशाळांमध्ये तात्पुरत्या स्वरुपात नेमण्यात आलेल्या क्रिडा शिक्षकांना प्रलंबित वेतन व मुदतवाढ देण्याबाबत

(१८) ३४०७३ (१२-०१-२०२२). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय आश्रमशाळांमध्ये तात्पुरत्या स्वरुपात नेमण्यात आलेल्या क्रिडा शिक्षकांचे गत सहा महिन्यापासून प्रलंबित असलेले वेतन देण्याबरोबरच क्रिडा शिक्षकांना एक वर्षापर्यंत मुदतवाढ देण्याबाबत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी आयुक्त यांनी अभिप्राय दिले आहे काय, असल्यास, त्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, आयुक्त यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार क्रिडा शिक्षकांना प्रलंबित वेतन देण्याबरोबर एका वर्षापर्यंत मुदतवाढ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (१६-०३-२०२२) : (१), (२), (३) व (४) राज्यातील प्रत्येक शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या कला व क्रीडा गुणांना वाव मिळण्याकरिता आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय दि.०६/०३/२०१८ नुसार कंत्राटी पध्दतीने क्रिडा शिक्षक / क्रिडा मार्गदर्शकाची (Coach) नियुक्ती करणेसाठी मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

मार्च, २०२० पासून संपूर्ण राज्यात कोरोना या संसर्ग रोगाची साथ चालु असल्याने राज्य शासनाच्या धोरणानुसार सर्व शासकीय आश्रमशाळा बंद ठेवण्यात आल्या होत्या. क्रिडा शिक्षकांच्या कंत्राटी स्वरूपात ज्या कालावधीसाठी सेवा घेण्यात आल्या आहेत त्या कालावधीचे वेतन अदा करण्यात आलेले आहे.

आदिवासी विकास विभागातंर्गत शासकीय आश्रमशाळा स्तरावर कंत्राटी क्रिडा, कला व संगणक शिक्षकांची आवश्यकता असल्याने सदर कंत्राटी शिक्षकांच्या नियुक्त्या बाह्यस्त्रोताद्वारे घेणे उचित राहिल जेणेकरून भविष्यात कंत्राटी कर्मचारी विभागास नियुक्ती कायम करणेबाबत हक्क सांगण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांच्याकडून अभिप्राय प्राप्त झाले आहेत. शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या रुचिनुसार, प्राविण्यानुसार व त्यांच्यातील कलागुणांचा विकास करण्यासाठी वरील शिक्षकांची/मार्गदर्शकांची नेमणूक केली जाते. त्यामुळे सदरील क्रीडा शिक्षकांची/मार्गदर्शकांची पदे कायमस्वरूपी भरण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

परांडा तालुका (जि.उस्मानाबाद) येथील साकत मध्यम
प्रकल्पाच्या कालव्याच्या गेटची दुरुस्ती करण्याबाबत

(१९) ३४१८२ (०५-०१-२०२२). डॉ.तानाजी सावंत (परांडा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परांडा तालुका (जि.उस्मानाबाद) येथील उत्तर पट्ट्यातील शेती पिकासाठी वरदान ठरलेल्या साकत मध्यम प्रकल्पाच्या कालव्याचे गेटला गेल्या पाच वर्षापासून गळती लागलेली असल्याने मोठया प्रमाणात पाण्याचा अपव्यय होत असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, साकत मध्यम प्रकल्पाच्या कालव्याचे गळतीचे काम तातडीने करावे म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी निवेदन दिल्याचे दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. जयंत पाटील (१०-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) साकत मध्यम प्रकल्पाचे डावा कालवा व उजवा कालवा गेट दुरुस्तीचे काम सन २०१८-१९ या वर्षात पूर्ण झालेले आहे. सध्या उजव्या कालव्याच्या गेट मधून होणारी पाणी गळती पूर्णपणे थांबलेली आहे.

डाव्या कालव्याच्या गेटच्या दगडी बांधकामाच्या भिंतीतून तसेच गेटमधून थोडया प्रमाणात गळती होत आहे.सदरील गळतीचे प्रमाण फार कमी आहे. डाव्या कालव्याच्या गेटच्या दगडी बांधकामाच्या भिंतीतून होणारी पाणी गळती बंद करण्यासाठी दगडी बांधकामाच्या भिंतीच्या दुरुस्तीचे काम प्राधान्याने हाती घेऊन पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

उल्हासनगर-५ (जि.ठाणे) येथिल गायकवाड पाडा येथे नविन सबस्टेशनच्या कामाबाबत

(२०) ३४४४० (१२-०१-२०२२). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर-५ (जि.ठाणे) येथील गायकवाड पाडा येथे नवीन सबस्टेशन मंजूर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सबस्टेशनच्या कामाकरीता रुपये ४२२८.३४ लक्ष किंमतीची निविदा मागविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सबस्टेशनचे कामास सुरुवात झाली आहे काय व किती दिवसात काम पूर्ण करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. नितिन राऊत (१६-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) उपकेंद्र उभारणीसाठीची जमिन महावितरण कंपनीकडून अद्याप हस्तांतरीत झाली नसल्याने, वीज नियामक आयोगाकडून उपकेंद्राच्या प्रस्तावास तत्वत: मान्यता मिळालेली नाही. व त्या अभावी राबविण्यात आलेली निवीदा प्रक्रिया ही रद्द करण्यात आली आहे. जमीन ताब्यात आल्यावर व वीज नियामक आयोगाची तत्वत: मान्यता प्राप्त झाल्यावर नियमानुसार पुढील कार्यवाही नियोजित आहे.

हिंगोली जिल्हयातील उच्च पातळी बंधाऱ्यांना प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत

(२१) ३४४८४ (१०-०१-२०२२). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयास राज्यपाल सिंचन अनुषेश मध्ये (१५०० हेक्टर) जाहीर होऊन ४ वर्ष झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त पोटा, जोडपरळी, पिंपळगाव कुटे, बंधाऱ्यांची कामे अद्यापही सुरू न झाल्यामुळे अनुशेष क्षेत्रफळ दिवसेंदिवस वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंतर्भूत उच्च पातळी बंधारे ह्यांची विशेष बाब म्हणून प्रशासकीय मान्यतेसाठी वसमत मतदार संघाचे विधानसभा सदस्यांनी जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री ह्यांच्याकडे दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच बंधारे लवकरात लवकर झाले तर वसमत मतदार क्षेत्रातील व परभणी जिल्ह्यातील तीव्र पाणी टंचाई दूर होईल, हे ही खरे आहे काय,

(५) उक्त कामास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत तसेच अर्थसंकल्पात निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. जयंत पाटील (१७-०३-२०२२) : (१) होय. मा.राज्यपाल महोदयांच्या निदेशात हिंगोली जिल्ह्याचा जून १९९४ अखेरचा सिंचनाचा अनुशेष १५१६० हेक्टर इतका घोषित करण्यात आला आहे.

(२) नाही. अनुशेषामध्ये घट होवून जून २०२० अखेरीस अनुशेष ७९१० हेक्टर शिल्लक आहे.

(३) होय.

(४) अंशत: खरे आहे. सदर बंधा-यांमुळे निश्चितच त्या-त्या भागास सिंचनाचा व पिण्याच्या पाण्याचा लाभ होणार आहे.

(५) जिल्ह्यातील पोटा, जोडपरळी, पिंपळगाव कुटे बंधाऱ्याच्या कामासाठी प्रशासकीय मान्यता अहवाल नविनत्तम दरसुचीने अद्ययावत करणे, समांतरपणे मध्यवर्ती संकल्पन चित्र संघटनेकडून घटक भागांची सविस्तर रेखाचित्रे प्राप्त करून घेण्याबाबतची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर चालू आहे.प्रशासकीय मान्यता प्राप्त झाले नंतर अर्थसंकल्पीय तरतूद करणे शक्य होईल.

(६) प्रश्नच उद्भवत नाही.

राज्यातील आदिवासीच्या समस्यांबाबत

(२२) ३४५१५ (१२-०१-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शैक्षणिक आरोग्य विषयक सुविधांचा अभाव असून कुप्रथेमुळे तेथील बालमृत्युचे प्रमाण वाढत असल्याचे दिनांक १५ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक वर्ष होऊन देखील आदिवासी समाज शासनाच्या विविध योजनेंपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बालमृत्युचे प्रमाण रोखण्यासाठी तसेच आदिवासींना शासकीय योजनेचा लाभ मिळावा यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (१६-०३-२०२२) : (१) हे खरे नाही,
(२) हे खरे नाही,
(३) एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत बालमृत्युचे प्रमाण रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना केल्या जातात.

१. भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेअंतर्गत अनुसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार व ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना प्रति दिन शाकाहारी मुलांना २ केळी व मांसाहारी मुलांना १ उकडलेले अंडे आठवडयातून ४ वेळा म्हणजेच महिन्यातून १६ दिवस एक वेळचा अतिरिक्त आहार देण्यात येत आहे.

२. राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बाल विकास केंद्र सुरु करण्यात आली आहेत. ग्राम बाल विकास केंद्रामध्ये तीन वेळचा अतिरीक्त आहार व आरोग्य खात्यामार्फत औषधोपचार करण्यात येतात.

३. राज्यातील पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरून निरंतर शिक्षण वृद्धीदृष्टीकोन समुदाय आधारित कार्यक्रम, रिअलटाईममॉनिटरींग व जनआंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

नवापूर (जि.नंदुरबार) तालुक्यातील कोरडी मध्यम प्रकल्पाच्या प्रस्तावित चतुर्थ प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावाबाबत

(२३) ३४५५३ (०५-०१-२०२२). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवापूर (जि.नंदुरबार) तालुक्यातील कोरडी मध्यम प्रकल्पाचा चतुर्थ प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रस्तावास मान्यता देण्यास किती कालावधी लागेल,
(३) असल्यास, प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर किती जमीनींना सिंचनाचा लाभ मिळेल,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (२४-०३-२०२२) : (१) होय.
(२) सदर प्रस्तावास मान्यता देण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर प्रगतीत आहे.

(३) प्रकल्पाची सिंचन क्षमता ३६५९ हे. एवढी असून त्यापैकी ३०५१ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ होत आहे. चतुर्थ सुप्रमा प्रस्तावास मान्यतेनंतर कालव्याची कामे पूर्ण करुन उर्वरित ६०८ हे. सिंचन क्षमता निर्माण होईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

अमरावती जिल्हापरिषद सर्व संवर्गनिहाय आरोग्य कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन अदा करण्याबाबत

(२४) ३४६१९ (०६-०१-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हा परिषद सर्व संवर्गनिहाय आरोग्य कर्मचारी मागील दीड वर्षापासून कोरोना काळात अहोरात्र नियमितपणे आरोग्य सेवा गावोगावी देत असतानाही मागील महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने आंदोलन केले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हापरिषदेतील सर्व संवर्गनिहाय आरोग्य कर्मचार्याचे तातडीने वेतन द्यावे यासाठी हेल्थ एम्प्लॉईज फेडरेशनच्या नेतृत्वात शेकडो आरोग्य कर्मचाऱ्यांनी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या कार्यालयाबाहेर आंदोलन करीत अन्य मागण्यांचेही निवेदने दिली आहेत, हे ही खरेआहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने चौकशी करुन त्वरीत वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (३०-०३-२०२२): (१) व (२) अशा आशयाचे निवेदन अध्यक्ष, हेल्थ एम्पालॉईज फेडरेशन यांनी दि. २७/०८/२०२१ रोजी जिल्हा परिषद, अमरावती यांनी दिले होते. सदर दिवसीय आंदोलन मागे घण्याची विनंती जिल्हा आरोग्य अधिकारी, अमरावती यांच्या स्तरावरुन अध्यक्ष, हेल्थ एम्पालॉईज फेडरेशन यांना करण्यात आली होती.
(३) वेळोवेळी पाठपुरावा करून आरोग्य कर्मचारी यांना वेतन अदा करण्याबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

अर्थसाहाय्य योजनेतील बीपीएलची अट शिथिल करण्याबाबत

(२५) ३४८०८ (१२-०१-२०२२). श्री.राजु पारवे (उमरेड) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अर्थसाहाय्य योजनेतील एखाद्या कुटुंबामधील प्रमुखाचा मृत्यू झाल्यास करण्यात येणा-या अर्थसहाय्यासाठी बी.पी.एल.ची अट आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बी.पी.एल.च्या अटीमुळे अनेक लाभार्थी लाभापासून वंचित राहतात, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने गरिबांसाठी असलेल्या विविध योजनेत बीपीएलची अट शिथिल केली आहे, घरकूल योजना, निराधार योजना यासारख्या अनेक योजनांमध्ये बीपीएलची अट शिथिल करण्यात आली, परंतु राष्ट्रीय कुटुंब अर्थसाहाय्य योजनेत आतापर्यंत बीपीएलची अट का शिथिल करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बीपीएल च्या अटीमुळे वंचीत असलेल्या लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाहि केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. धनंजय मुंडे (१४-०३-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. सदर योजनेतंर्गत दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नोंद असलेल्या १८ ते ५९ वयोगटातील कर्ता स्त्री/ पुरुष मरण पावल्यास त्यांच्या कुटुंबियांना एक रकमी रु. २०,०००/- इतके अर्थसहाय्य देण्यात येते. केंद्र पुरस्कृत योजनेच्या अटी व शर्ती हया केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आहेत. त्यामुळे सदरहू योजनेची राज्य शासनामार्फत फक्त अंमलबजावणी करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

आपले सरकार प्रकल्पाशी निगडीत व सीएससी-एसपीव्ही कंपनी बरोबर इतर अनेक प्रकल्पांसदर्भात माहिती मिळणेबाबत

(२६) ३४८६५ (०६-०१-२०२२). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आपले सरकार प्रकल्पाशी निगडीत व सीएससी-एसपीव्ही कंपनी बरोबर इतर अनेक प्रकल्पांसदर्भात तातडीने माहिती मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास अति. मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार अद्यापही माहिती देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. हसन मुश्रीफ (१५-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर निवेदनास शासनाच्या दि.२१ जून २०२१ च्या पत्रान्वये माहिती देण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

बुलढाणा तालुका शेतकरी खरेदी विक्री समितीवर
प्रशासकीय मंडळ नियुक्त करणेबाबत

(२७) ३४८८१ (१२-०१-२०२२). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा विधानसभा मतदार संघातील बुलढाणा तालुका शेतकरी खरेदी विक्री समितीवर प्रशासकीय मंडळ नियुक्त करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी सहकार व पणन मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी दिलेल्या निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०६-०४-२०२२) : (१) होय.

(२) बुलढाणा तालुका शेतकी खरेदी विक्री समिती या संस्थेच्या संचालक मंडळाची मुदत दिनांक ५.८.२०२० रोजी संपुष्टात आल्याने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा यांनी दिनांक २४.९.२०२० रोजी प्रशासकाची नियुक्ती केली होती. सदर आदेशाने व्यथित होऊन संस्थेच्या संचालक मंडळाने दिनांक ६.१०.२०२० रोजी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांचेसमोर अपील क्रमांक २०/२०२० दाखल केले होते. सदर अपीलावर दिनांक १५.१२.२०२० रोजी झालेल्या सुनावणीत अपीलार्थीच्या हक्कात आदेश पारित करुन प्रशासक नियुक्तीचा आदेश रद्द केला आहे. त्यामुळे संस्थेवर मुळ संचालक मंडळ कार्यरत राहिले आहे.

राज्यशासनाच्या दिनांक १० जुलै, २०२० च्या अधिसुचनेमध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७३ अअअ मधील पोटकलम ३ मधील दाखल जादा परंतुकान्वये “परंतु जर संस्थेच्या समितीची निवडणुक, संस्थेच्या समितीच्या सदस्यांना जबाबदार धरता येणार नाही अशा कोणत्याही कारणास्तव घेतली जाऊ शकत नसेल तर, समितीचे विद्यमान सदस्य नवीन समिती यथोचितरित्या गठित होईपर्यंत सदस्य असल्याचे मानण्यात येईल”, असे नमुद आहे. त्यामुळे विद्यमान समिती सदस्य यांना सदस्य म्हणून नियमितपणे असण्याचे संरक्षण प्राप्त झाले असून वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन अध्यादेश व दिनांक २.११.२०२१ च्या अधिसूचनेद्वारे आजही कायम आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या पथदिव्यांची विद्युत जोडणी करुन वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी डी.पी.डी.सी. अंतर्गत निधीची तरतूद करण्याबाबत

(२८) ३५००९ (०६-०१-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायती अंतर्गत येणाऱ्या पथदिव्यांचे वीज बिले गेल्या कांही दिवसांपासून निधी अभावी थकीत असल्यामुळे महावितरण कंपनीकडून विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी अभावी ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या पथदिव्यांची विद्युत जोडणी करुन विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी डी.पी.डी.सी. अंतर्गत निधीची तरतूद करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हयाचे पालकमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने चौकशी करुन विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी डी.पी.डी.सी. अंतर्गत निधीची तरतूद करण्याबाबतच्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे तसेच शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०९-०३-२०२२) : (१) हे खरे आहे.
चंद्रपूर जिल्हयातील पंचायत समिती, सिंदेवाही अंतर्गत काही ग्रामपंचायतींच्या हद्दीतील रस्त्यांवरील पथदिव्यांच्या विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला होता.
(२) हे अशंत: खरे आहे.
जिल्हयातील ग्रामपंचायतीचे रस्त्यावरील वीज देयकाचा भरणा करण्यासाठी जिल्हा नियोजन समिती मार्फत तरतूद करणेबाबत जिल्हा परिषदेने दिनांक ८.९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांना विनंती केली आहे.
(३) ग्रामविकास विभाग, शासन ज्ञापन दिनांक १५.११.२०२१ अन्वये सन २०२१-२२ या वित्तीय वर्षामध्ये ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यावरील दिवाबत्तीची विद्युत देयके भरण्यासाठी जिल्हा परिषद, चंद्रपूर यांच्याकडे निधी वितरित करण्यात आला आहे. सदर निधीमधून ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यावरील विद्युत देयकाचा भरणा करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) लागू नाही.

निफाड (जि. नाशिक) तालुक्यात उद्योग क्षेत्रात चालना मिळण्याबाबत

(२९) ३५०५० (१२-०१-२०२२). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निफाड (जि.नाशिक) तालुक्यात औद्योगिक वर्गीकरणामध्ये सी-झोनमध्ये समावेश करण्यात आलेला असून निफाड तालुक्याचा डी-प्लस झोनमध्ये समावेश करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निफाड तालुका हा कृषि उद्योगामध्ये अग्रेसर असल्याने या उद्योगांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळणे क्रमप्राप्त असल्याने केवळ कृषि उद्योगांसाठी डी-प्लस झोनमध्ये वर्गीकरण करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०४-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्य शासनाचे नविन औद्योगिक धोरण-२०१९ हे दिनांक ७ मार्च, २०१९ अन्वये जाहीर करण्यात आले असून, त्यानुषंगाने सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१९ ची अंमलबजावणी दिनांक १६.०९.२०१९ च्या शासन निर्णयान्वये करण्यात येत आहे. सदरची योजना ही दिनांक ०१.०४.२०१९ पासून लागू करण्यात आलेली असून, सदर योजनेतंर्गत कृषी व अन्न प्रक्रिया उद्योगांना इतर उत्पादक घटकांपेक्षा जास्तीची प्रोत्साहने व जास्तीचा अनुदान उपभोगण्याचा कालावधी अनूज्ञेय करण्यात आला आहे.

तसेच शासन निर्णय ३१.०८.२०२० अन्वये कृषी व अन्न प्रक्रिया उद्योगांकरीता सामुहिक प्रोत्साहन योजने अंतर्गत मोठया व विशाल प्रकल्पासाठींचे गुंतवणुकीचे / रोजगाराचे निकष व प्रोत्साहने सुधारित करण्यात आली आहेत. तसेच या शासन निर्णयान्वये कृषी व अन्न प्रक्रिया उद्योगांना कमीत कमी गुंतवणुक / रोजगार निर्मितीवर जास्तीची प्रोत्साहने / प्रोत्साहन कालावधी अनुज्ञेय करण्यात आला आहे. करण्यात आलेली आहेत.

तसेच शासन पूरक पत्र दि. ०८ सप्टेंबर, २०२१ अन्वये विशाल प्रकल्पासाठी दिनांक ३१.०८.२०१५ पासून पुढील कालावधीतील घटक मागणी करेल त्या कोणत्याही ५ वर्ष कालावधीतील घटकाची गुंतवणुक ग्राहय धरून प्रोत्साहने अनुज्ञेय करण्यात आलेली आहेत. तसेच मोठया घटकाकरीता दिनांक ३१.०८.२०१६ पासून घटक मागणी करेल त्या कोणत्याही ४ वर्षे कालावधीतील गुंतवणुक ग्राहय धरुन प्रोत्साहने अनुज्ञेय करण्यात आली आहेत.

सामुहिक प्रोत्साहन योजनेतंर्गत राज्यातील विविध जिल्हयातील कृषी व अन्न प्रक्रियेवर आधारित उदयोगांना वाढीव लाभ देण्यासाठी शासनाने ठोस प्रयत्न केले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

वागदे (ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग) येथील लघु पाटबंधारे योजना प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत

(३०) ३५०९२ (०५-०१-२०२२). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वागदे (ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग) येथील लघु पाटबंधारे योजना प्रकल्पाच्या कामाला दिनांक ९ जून, २००४ रोजी वा त्यासुमारास मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००५ मध्ये कामाची सुरुवात करण्यात आली व सन २००९ सालापासून काम बंद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी बाधीत शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत भूसंपादन केल्याचा निधी वितरीत करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्पाचे बंद काम त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंकरराव गडाख (१५-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे. शासन निर्णय क्र लपायो १२०३/५११/प्रक्र ३१४/जल-१ दि. ०९ जून २००४ अन्वये मान्यता देण्यात आली.

(२) होय, हे खरे आहे. सन २००५ मध्ये कामाची सुरूवात करण्यात आली व सन २००९ मध्ये जमिन धारकांच्या जमिनीचा मोबदला अदा न झाल्यामुळे जमिन धारकांनी प्रकल्पाचे काम बंद पाडले.

(३) होय, हे खरे आहे.

(४) बुडीत क्षेत्राच्या भूसंपादनाची तीन प्रकरणे आहेत.

वागदे-बुडीतक्षेत्र, धरणतळ, सांडवा, प्रवेश व पुच्छ कालवा येथील आवश्यक असलेल्या एकूण ३६-७२-३० हे. जमीनी पैकी वागदे गावाच्या १८-८५-८५ हे. जमीनीचा रक्कम रु. ११८.४० लक्षचा अंतिम निवाडा घोषित करण्यात आला आहे. त्यापैकी रक्कम रु. २२ लक्ष महसूल विभागाकडे वर्ग करण्यात आलेली आहे. उर्वरित रक्कम रु. ९६.४० लक्ष ची मागणी विभागीय कार्यालयाने दि.१३.०८.२०१७ व दि.२७.०३.२०१९ च्या पत्रान्वये शासनाकडे केली आहे.

हळवल - बुडीतक्षेत्र, धरणतळ, सांडवा, प्रवेश व पुच्छ कालवा येथील आवश्यक असलेल्या एकूण ३६-७२-३० हे. जमीनीपैकी हळवल गावाच्या ४-४७-३० हे. जमीनीचा रक्कम रु. ५.५७ लक्षचा अंतिम निवाडा घोषित करण्यात आला आहे. रक्कम रु. ५.५७ लक्ष ची मागणी विभागीय कार्यालयाने दि.१३.०८.२०१७ व दि.२७.०३.२०१९ च्या पत्रान्वये शासनाकडे केली आहे.

कसवण - बुडीतक्षेत्र, धरणतळ, सांडवा, प्रवेश व पुच्छ कालवा येथील आवश्यक असलेल्या एकूण ३६-७२-३० हे. जमीनी पैकी कसवण गावाच्या १३-३८-१० हे. जमीनीचा रक्कम रु. ३३.४८ लक्षचा अतिम निवाडा घोषित करण्यात आला आहे. त्यापैकी रक्कम रु. २२.३८ लक्ष महसूल विभागाकडे वर्ग करण्यात आलेली आहे. उर्वरित रक्कम रु. ११.१० लक्ष ची मागणी विभागीय कार्यालयाचे पत्र दि.१३.०८.२०१७ व दि.२७.०३.२०१९ च्या पत्रान्वये शासनाकडे केली आहे.

सदर कामाला मंजूर प्रशासकीय मान्यता रक्कम पूर्ण खर्च झाल्यामुळे कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. मृद व जलसंधारण विभागाची सन २०२०-२१ ची दरसुची ०१/०९/२०२१ पासून लागू झाल्याने व स्वामित्व धनशुल्कमध्ये वाढ झाल्याने त्यानुसार अंदाजपत्रक अद्ययावत करणेसाठी व अंदाजपत्रक राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती (SLTAC) च्या मंजूरीसाठी अद्ययावत करण्यासाठी उपविभागीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राजापूर तालुक्यात (जि.रत्नागिरी) येथील अर्जुना मध्यम प्रकल्पाच्या कालव्यासाठी उत्खनन करण्यात आलेली माती उचलण्याबाबत

(३१) ३५११३ (०६-०१-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर तालुक्यात (जि.रत्नागिरी) तब्बल हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च करुनही अर्जुना मध्यम प्रकल्पाच्या कालव्यासाठी उत्खनन करण्यात आलेली माती उचलण्यात न

आल्यामुळे शेतक-यांना शेती करता आलेली नसल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेती न केल्यामुळे शेतक-यांना नाहक नुकसान सहन करावे लागले असून नुकसान भरपाईपोटी कोणतीच आर्थिक मदत मिळालेली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे ओह काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतक-यांना तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत तसेच उत्खनन करण्यात आलेली माती तात्काळ उचलण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (२४-०३-२०२२) : (१) होय.

(२) बंदिस्त नलिका वितरण प्रणालीकरीता चर खोदल्यामुळे व माती दुतर्फा साठवल्यामुळे ज्या शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी अडचणी आल्या, त्यांचे बाबतीत तातडीने माती बाजूला करून व चर बुजवून क्षेत्र उपलब्ध करून देण्यात आले आहे.

(३) क्षेत्रीय स्तरावरून पाहणी करण्यात आलेली आहे. पावसाळा हंगामानंतर आता बंदिस्त नलिका वितरण प्रणालीकरिताची कामे पुनश्च: सुरू झालेली असून सदर कामे संपताच अपुर्ण राहीलेले चर बुजविण्याचे काम तातडीने पुर्ण करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पाथ्रा (ता.केज, जि. बीड) येथे नवीन १३२ केव्ही उपकेंद्र सुरु करण्याबाबत

(३२) ३५१२१ (१२-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) युसुफवडगाव (ता. केज, जि. बीड) येथील ३३ केव्ही उपकेंद्राला १३२ केव्ही उपकेंद्र, कळंब, (जि. उस्मानाबाद) येथून विदयुत पुरवठा होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, युसुफवडगाव ३३ केव्ही उपकेंद्राला केज, (जि. बीड) तालुक्यातील माळेगाव, धनेगाव, बनसारोळा, व अंबाजोगाई तालुक्यातील आपेगाव ही ३३ केव्ही उपकेंद्र जोडली असून कळंब ते युसुफवडगाव वाहिनीची लांबी ३८ कि.मी. असल्याने लांब अंतरामुळे वरील उपकेंद्रातील नागरिकांना व शेतकऱ्यानां कमी दाबाने विदयुत पुरवठा होतो असल्याने त्यांची मोठ्या प्रमाणत विजे अभावी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केज (जि. बीड) तालुक्यात पाथ्रा येथे महावितरण कडून नवीन १३२ केव्ही उपकेंद्र मंजूर करावे त्यामुळे १३२ केव्ही कळंब, २२० केव्ही मुरुड, १३२ केव्ही केज, व अंबाजोगाई तालुक्यातील काही भाग त्याठिकाणी हस्तांतरीत झाल्याने वरील चारही उपकेंद्राचा कमी दाबाच्या वीज पुरवठ्याचा प्रश्न सोडविला जाईल याबाबत शासनाने तातडीने योग्य तो निर्णय घ्यावा म्हणून तेथील लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ५ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वीज पुरवठा नियमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. नितिन राऊत (०९-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशतः खरे आहे. सद्यस्थितीत ग्राहकांना योग्य दाबाने सुरळीत वीज पुरवठा करण्याच्या दृष्टीने तातडीची उपाययोजना म्हणून Revamped Distribution Sector Scheme (वितरण क्षेत्र सुधारणा योजना) अंतर्गत ३३ के.व्ही. माळेगाव उपकेंद्र ते ३३ के.व्ही युसुफवडगाव उपकेंद्रादरम्यान ७ कि.मी. ची ३३ के.व्ही. नवीन उच्च दाब वाहिनी टाकण्याचे काम प्रस्तावित करण्यात आले आहे. सदरील प्रस्तावित वीज वाहिनीचे काम पुर्ण झाल्यास ३३ के.व्ही युसुफवडगाव वाहिनीवरील वरील दोन उपकेंद्रे १३२ के.व्ही. केज उपकेंद्रांतून विद्युत पुरवठा होत असलेल्या ३३ के.व्ही. चिंचोली माळी वीज वाहिनीवर जोडता येतील व ३३ के.व्ही. युसूफवडगाव वीज वाहिनीवरील भार कमी होवून ग्राहकांना सुरळीत व योग्य दाबाने वीज पुरवठा करता येईल.
(३) दि.५ एप्रिल, २०२१ चे लोकप्रतिनिधी यांचे निवेदन महावितरण कंपनीस प्राप्त झाले आहे.
(४) व (५) अंबेजोगाई विभागांतर्गत १३२ के.व्ही. पाथ्रा येथे नवीन उपकेंद्राच्या तांत्रिक तपासणीचे काम प्रगतीपथावर आहे.

एरंडोल (जि. जळगांव) येथील अंजनी मध्यम प्रकल्पाच्या कामाबाबत

(३३) ३५३०५ (०७-०१-२०२२). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एरंडोल (जि. जळगांव) येथील अंजनी मध्यम प्रकल्पाची ९०% कामे सन २००८ पासून पुर्ण झाली असुन फक्त कालव्यांची उर्वरित कामे तसेच वितरिकांची कामे अपूर्ण असल्याने धरणात सन २००८ पासुन पाणीसाठा उपलब्ध असुनही शेती सिंचनासाठी धरणाचे पाणी वापरता येत नाही, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, सदर प्रकल्पावर २००.५७ कोटी इतका निधी आजपावेतो खर्च झाला आहे व उर्वरित कामासाठी ४३.५७ कोटी निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निधी अभावी हजारो हेक्टर क्षेत्र सिंचनापासुन वंचित असल्याने आवश्यक ४३.५७ कोटी निधी उपलब्ध करुन प्रकल्पाच्या तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मंजुरी देणेकामी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. जयंत पाटील (२४-०३-२०२२) : (१) अंशतः खरे आहे, अंजनी धरणाचे काम पूर्ण झाले असून वर्ष २०१४-१५ पासून धरणामध्ये १९.३९ दलघमी इतका पाणीसाठा होत आहे. मुख्य कालव्याचे कामे अंतिम टप्प्यात आहेत. मुख्य कालव्यावरील वितरण प्रणालीचे काम पारंपारीक पध्दतीने करण्यास शेतकऱ्यांचा विरोध असल्याने सदरचे काम PDN ने प्रस्तावित आहे.

धरणाच्या पाणीसाठ्यातून सन २०१४-१५ पासून काही प्रमाणात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सिंचनाचा लाभ देण्यात आलेला आहे.
(२) अंशत: खरे आहे. अंजनी मध्यम प्रकल्पावर डिसेंबर २०२१ अखेर एकूण रु. २०७.३६ कोटी एवढा खर्च झालेला आहे. तसेच उर्वरीत कामासाठी रू. २४.४८ कोटी निधीची आवश्यकता आहे.
(३) सद्यस्थितीत अंजनी मध्यम प्रकल्पाच्या तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मंजुरी देण्याची कार्यवाही शासन स्तरावर प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

धामणगाव (जिल्हा अमरावती) येथील अनेक प्रकल्पामुळे शेतीचे नुकसान होत असल्याबाबत

(३४) ३५७२८ (०५-०१-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धामणगाव (जिल्हा अमरावती) रेल्वे मतदारसंघातीळ अनेक प्रकल्पांमध्ये चुकीचा सर्व्हे करण्यात आलेला होता त्यामुळे प्रकल्पातील अडवलेल्या पाण्यामुळे लगतच्या शेत जमिनी खराब होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्पामुळे शेतीची गुणवत्ता खराब होवून शेती पीक घेणे योग्य राहिलेले नाही तसेच अनेक ठिकाणी बॅक वॉटर झिरो पॉईंट च्या बाहेर सुद्धा जाते, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, शेतीची गुणवत्ता खराब झालेल्या जमिनीमध्ये शेतकऱ्यांनी पीक कसे घ्यावे त्याबाबत शासन प्रशिक्षण देणार आहे काय,
(४) असल्यास, अशा सर्व शेत जमिनींना शासन अधिग्रहित करुन त्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (०६-०४-२०२२) : (१) हे खरे नाही.
धामणगाव रेल्वे मतदारसंघांतर्गत चांदूर रेल्वे तालुक्यातील रायगड नदी प्रकल्पाचे बुडीत क्षेत्राकरीता पुर्ण संचय पातळीप्रमाणे भूसंपादन करण्यात आलेले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

चिपळूण (जि. रत्नागिरी) येथील बाजारपेठ व शहरामध्ये आखण्यात आलेली पूररेषा रद्द करून पूरमुक्तीसाठी प्रयत्न करण्याच्या मागणीबाबत

(३५) ३५७५८ (०६-०१-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि. रत्नागिरी) येथे दिनांक २१ ते २५ जुलै २०२१ रोजी वा त्यासुमारास झालेल्या अतिवृष्टी आणि महापुरामुळे येथील बाजारपेठ व शहराचा बहुतांश भाग पाण्याखाली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महापुरानंतर बाजारपेठ व शहरामध्ये ठिकठिकाणी लाल व निळया रंगाच्या रेषा (ओळी) आखून पूररेषा निश्चित करण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक व्यापारी, नागरीक, लोकप्रतिनिधी यांचा या पुररेषेला विरोध असून ती रद्द करण्यात यावी आणि पूरमुक्तीसाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने प्रशासनाकडून पूरमुक्तीसाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (३०-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही.

महापूरापूर्वीच शहरामध्ये लाल व निळ्या रेषा माहे एप्रिल व मे, २०२१ अखेर आखून निश्चित करण्यात आल्या आहेत.
(३) होय, हे खरे आहे.
(४) केंद्रीय पाणी व विज संशोधन केंद्र, (CWPRS), पुणे यांचे पथकाकडून दि.२२.१०.२०२१ रोजी क्षेत्रीय पाहणी करण्यात आली. नदी पात्रातील गाळ काढणे व नदी किनारी आवश्यक ठिकाणी संरक्षक भिंती, मातीचे बंधारे इ. उपाययोजना करणे नियोजित असून त्यानुषंगाने पूरसंरक्षक कामाबाबत आवश्यक कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

तसेच अप्पर जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे सुचनेनुसार वाशिष्ठी नदी पात्रातील अडथळे असलेली गाळ व बेटे यांची पहाणी करुन गाळाची ठिकाणे व काढावयाचे परिमाण निश्चित केले असून सद्यस्थितीत शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत वाशिष्ठी नदीतील गाळ व बेटे काढण्याच्या अंदाजपत्रकास दि.०७/०३/२०२२ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून, पुढील काम प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

पुणे जिल्ह्यातील खडकवासला प्रकल्पाच्या नवीन मुठा उजवा कालव्याची दुरुस्ती करण्याबाबत

(३६) ३५७९६ (०६-०१-२०२२). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील खडकवासला प्रकल्पाच्या नवीन मुठा उजवा कालवा ०/०० कि.मी. ते २०२/०० कि.मी. मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कालव्याची दुरुस्ती करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधीनी माहे ऑगस्ट, २०२१ ते ऑक्टोबर, २०२१ या कालावधीत वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने काय आढळून आले,
(४) असल्यास, उपरोक्त कालव्याच्या दुरुस्तीच्या केलेल्या मागणीच्या अनुषंगाने सदरहू कालव्याची दुरुस्ती व निधी उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (२९-०३-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.

नवीन मुठा उजवा कालव्यामधून सन १९६१ पासून सिंचन होत असून कालव्यातून मागील ६० वर्षापासून सिंचन सुरू असून कालव्याच्या निवडक ठिकाणी काही प्रमाणात दुरवस्था झाली आहे.

(२) होय.

(३) नवीन मुठा उजवा कालव्याची कि.मी.०/०० ते २०२/०० मधील भागाची पाहणी व सर्वेक्षण क्षेत्रिय कार्यालयामार्फत करण्यात आले आहे. कालव्याच्या निवडक ठिकाणी भराव दुरूस्ती, बांधकामे दुरूस्ती, अस्तरीकरणाची कामे करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) कालव्यावरील निवडक ठिकाणी भराव दुरूस्ती, बांधकामे दुरूस्ती, अस्तरीकरणाची कामे करणे, इ. गळती प्रतिबंधक कामे करण्यास विशेष दुरूस्ती व विस्तार व सुधारणा अंतर्गत रु.२३.२८ कोटी, सिंचन पुनर्स्थापना निधी अंतर्गत रु. ५७.२४ कोटी तसेच बिगर सिंचन प्रापणसूची सन २०२१-२२ अंतर्गत रु.१२.९७ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. चालू वर्षी प्राप्त निधीच्या अनुषंगाने अंदाजपत्रके तयार करून त्यास सक्षम स्तरावरून तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे. सद्यस्थितीत त्याची निविदा कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वसमत येथील (जि.हिंगोली) टोकाई सहकारी साखर कारखाना लि. वसमत या साखर कारखान्यात झालेला गैरव्यवहार

(३७) ३५८६९ (१२-०१-२०२२). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्री.इंद्रनिल नाईक (पुसद), श्री.यशवंत माने (मोहोळ) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसमत येथील (जि.हिंगोली) टोकाई सहकारी साखर कारखाना लि. वसमत या साखर कारखान्याच्या संचालक व कार्यकारी संचालक मंडळाने केलेल्या अनियमितता व गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबतचे मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास सहकार मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने संचालक व कार्यकारी संचालक यांच्यावर कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०७-०४-२०२२) : (१) होय.

(२) सदर दिनांक १२.०९.२०२१ च्या निवेदनाच्या अनुषंगाने अशा स्वरुपाच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने प्रादेशिक संहसंचालक (साखर), नांदेड यांनी तक्रारदारांची सुनावणी ठेवून संबंधित अर्जदारास म्हणणे मांडण्याची संधी दिली होती. सदर तक्रारदारांनी संयुक्त स्वाक्षरीतील पत्रान्वये तक्रार अर्ज मागे घेत असल्याबाबत कळविले. तसेच, त्यांच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीत तथ्य आढळून आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

वर्धा जिल्हयातील कार नदी प्रकल्पातंर्गत झालेल्या कालव्याची दुरुस्ती करणेबाबत

(३८) ३५९७२ (०६-०१-२०२२). श्री.दादाराव केचे (आर्वी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी विधानसभा मतदार क्षेत्रातील कार नदी प्रकल्पातंर्गत कारंजा व आष्टी (जि.वर्धा) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी मिळण्याच्या उद्देशाने ३३ कि.मी. लांबीचे मुख्य कालवे झाले असून त्या कालव्याद्वारे ५६०० हेक्टर क्षेत्र सिंचन अपेक्षीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कालव्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने तेथील कालव्याद्वारे पाणी फक्त १५ कि.मी. पर्यत पोहचत असून १५०० हेक्टर सिंचन होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कालव्यांच्या दुरूस्तीसाठी शासनाची मान्यता मिळाली असतानाही अद्यापि त्या कालव्याच्या दुरूस्ती कामास सुरूवात झालेली नसल्याने कारंजा व आष्टी तालुक्यातील १७ गावे सिंचनापासून वंचीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू कामाचे अंदाजपत्रकाच्या प्रस्तावास शासन तातडीने मान्यता देऊन दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (२४-०३-२०२२) : (१) होय.

(२) होय, अशंत: खरे आहे. कार प्रकल्पाच्या मुख्य कालव्याच्या अतिभरावातून तसेच अतिखोदाईतून गेलेल्या भागात होणा-या गळतीमुळे १७ कि.मी. पर्यंत पाणी पोहचत आहे. सदर प्रकल्पाद्वारे २००० हेक्टर सिंचन होत आहे.

(३) कालव्याचे अस्तरीकरण करण्याकरीता प्रकल्पाच्या मंजुर चतुर्थ सुप्रमामध्ये मान्यता प्राप्त असुन, मुख्य कालवा कि.मी. १० ते २० मधील अस्तरीकरण / आर.सी.सी.ट्रफ च्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी प्राप्त झालेली असुन सदर कामे जून, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) वरील प्रमाणे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अप्पर वर्धा प्रकल्पातील मौजा मांडला (ता. आर्वी, जि.वर्धा) येथील डाव्या मुख्य कालव्याची लांबी वाढविण्याबाबत

(३९) ३५९७८ (०५-०१-२०२२). श्री.दादाराव केचे (आर्वी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अप्पर वर्धा प्रकल्पातील मौजा मांडला, (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील मुख्य डाव्या कालव्याची लांबी वाढवुन वाढोणा सर्कल मधील असलेल्या कोरडवाहु शेतकऱ्यांच्या शेतीला सिंचनाची सोय होण्याकरिता मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजा वाढोणा सर्कल मधील मौजा चिंचोली, बेढोणा, हिवरा, पिंपळखुटा, गुमगांव, तरोडा, किन्हाळा, बोथली, तळेगांव रघुजी, दाणापुर, सुकळी व उमरी अशा अनेक गावातील शेतकऱ्यांना सिंचनाची सोय नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना सिंचनाची सोय होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१७-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

उर्ध्व वर्धा प्रकल्पातील मौजा मांडला (ता. आर्वी, जि. वर्धा) येथील डाव्या मुख्य कालव्याची लांबी वाढवून मौजा वाढोणा सर्कल मधील कायम स्वरुपी कोरडवाहु शेतकऱ्यांच्या शेतीला सिंचनाची सोय उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्याबाबतचे निवेदन प्राप्त झाले होते.

(२) सदर भाग या प्रकल्पाच्या लाभक्षेत्राबाहेर असल्यामुळे उर्ध्व वर्धा प्रकल्पावरुन सदर भागास सिंचनाची सोय नाही.

(३) उर्ध्व वर्धा प्रकल्पाचा पाणी वापर १००% असल्यामुळे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात नविन क्षेत्र अंतर्भुत करणे शक्य नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर जिल्हयातील सोनेगांव (निपानी) एम.आय.डी.सी. हिंगणा अंतर्गत संपादित केलेल्या जमिनीच्या वारसदारांना मोबदला देण्याबाबत

(४०) ३६१६७ (१२-०१-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील सोनेगांव (निपानी) एम.आय.डी.सी. हिंगणा अंतर्गत भुखंड क्र. १२०/२ आराजी ३.४५ हे आर लागवड योग्य नसलेली जमिन श्री.जागो काबंळे यांचे मालकीची सन १९७८-७९ पासून संपादीत केलेल्या जमिनीचा संबंधित वारसंदाराना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून कोणताही मोबदला मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी वारसंदाराना मोबदला मिळण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी उद्योग व खनिकर्म मंत्री यांना दिनांक १२ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने वारसदारास मोबदला उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (११-०३-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) म.औ.वि.महामंडळाकडील अभिलेखानुसार स्व. जागो लहानु कांबळे यांना दि. २५/०९/१९७० रोजी सदर जमिनीचा मोबदला तत्कालीन नुकसान भरपाईच्या दरानुसार वाटप केला असून उपविभागीय अधिकारी, नागपूर यांनी दि. १३/०५/१९७१ रोजी सदर जागेचा रितसर ताबा म.औ.वि. महामंडळाकडे हस्तांतरीत केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्हयातील गंगापूर प्रकल्पाच्या डाव्या कालव्याचे नुतनीकरण करणेबाबत

(४१) ३६३१४ (०६-०१-२०२२). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयातील गंगापूर प्रकल्पाच्या डाव्या कालव्याचे नुतनीकरण करण्याबाबत व विशेष दुरुस्ती करण्याबाबतचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी उपकार्यकारी अभियंता नाशिक पाटबंधारे विभाग यांनी अधिक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण नाशिक यांचेकडे माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने अंदाजपत्रकास मंजुरी दिली आहे काय, असल्यास सदर कालव्याच्या नुतनीकरणाचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१०-०३-२०२२) : (१) होय.
(२) सदर विशेष दुरुस्ती अंदाजपत्रक शासनास प्राप्त असून शासनाने उपस्थित केलेल्या शेऱ्यांचा पूर्तता अहवाल महामंडळाकडून शासनास प्राप्त आहे. त्यानुसार प्रशासकीय मान्यतेबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

लाडेगाव, (ता. केज, जि. बीड) येथे शासकीय गायरान जमिनीवर सौर उर्जा प्रकल्प उभारण्याबाबत

(४२) ३६५०९ (१२-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाडेगाव गायरानापासून जवळ बन (ता. केज, जि, बीड) ३३ केव्ही उपकेंद्र एक ते दोन किमी अंतरावर आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाडेगाव (ता. केज, जि. बीड) येथील ७५ एकर शासकीय गायरान जमिनीवर सौर ऊर्जा प्रकल्प उभारावा यासाठी ग्रामपंचायत कार्यालयाने ठराव संमत केला असून त्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक २ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून गायरान जमिनीवर सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. नितिन राऊत (०८-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) महानिर्मिती कंपनीतर्फे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत टप्पा-१ मधील १८४ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांतर्गत लाडेगाव (ता.केज,जि.बीड) येथील २२ हेक्टर जमिनीवर अंदाजे १० मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचा समावेश असून निविदा धारकास कार्यादेश निर्गमित करण्यात आले आहेत. लाडेगाव (ता.केज,जि.बीड) येथील गट क्र.१४३ मधील २९.९२ हे.आर पैकी २२.०० हे.आर गायरान जमिनीवर सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याकरीता प्रस्ताव दि.०७.०४.२०२१ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे सादर केला आहे. त्यानुसार दि.२६.०८.२०२१ रोजी गायरान जमिनीची मोजणी करण्यात आली आहे. वन विभागातर्फे ना हरकत प्रमाणपत्र प्रलंबित आहे. सदर जमीन अधिग्रहण करण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

समाजकल्याण विभागामध्ये उपायुक्त व सहआयुक्त यांची पदे रिक्त असल्याबाबत

(४३) ३६५५६ (१२-०१-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समाजकल्याण विभागामध्ये उपायुक्त व सहआयुक्त यांची पदे मोठया प्रमाणात रिक्त असून उपायुक्त ची ९ पदे सहआयुक्त पदावर श्रेणी वर्धन करण्याबाबतचा प्रस्ताव गेल्या तीन वर्षापासून शासन दरबारी प्रलंबित असल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये उघडकीस आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सहआयुक्त व अतिरिक्त आयुक्त तथा अध्यक्ष या पदावर पदोन्न्नती देण्यास दिरंगाई होत असल्याने राज्य मागासवर्ग आयोग मधील सदस्य सचिव तथा सह आयुक्त हे पद रिक्त त्यामुळे ओबीसी सर्वेक्षण प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासन स्तरावर तातडीने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. धनंजय मुंडे (१७-०३-२०२२) : (१) व (२) हे खरे आहे.

समाज कल्याण आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील ५ पदे सहआयुक्त दर्जाची असून प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण हे पद उपायुक्त दर्जाचे असून सदर पदाचे श्रेणीवर्धन करुन सदरची पदे सह आयुक्त दर्जाचे करण्याकरीता सुधारित आकृतीबंधात दुरुस्ती करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३ व (४) हे खरे नाही,

सह आयुक्त श्री. डी. डी. देशमुख यांच्याकडे राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य सचिव या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

वाबळेवाडी (ता.शिरुर, जि.पुणे) जिल्हापरिषद प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांनी केलेला गैरव्यवहार

(४४) ३६६०० (०६-०१-२०२२). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.सुनिल शेळके (मावळ) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील शिरुर तालुक्यातील वाबळेवाडी जिल्हापरिषद प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकाकडून शाळेमध्ये प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांकडून शाळा सुधार निधीच्या नावाखाली मोठी रक्कम जमा झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्राथमिक शाळा पूर्व वर्ग (बालवाडी) सुरु करणेबाबत शाळेने परवानगी घेतली होती काय,
(३) असल्यास, वाबळेवाडी या शाळेला इयत्ता आठवी पर्यंत वर्गाची मान्यता असताना सदर शाळेतील इयत्ता नववी व इयत्ता दहावी च्या विद्यार्थ्यांची कागदोपत्री नोंद कासारी येथील माध्यमिक विद्यालयात करुन प्रत्यक्षात वाबळेवाडी शाळेतच त्यांचे अध्यापन केले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०७-०४-२०२२) : (१) हे खरे आहे. लोकसहभागातून शाळेकरिता भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्याचा उपक्रम शाळेने राबविला होता. त्याचाच भाग म्हणून "शाळा सुधार" निधीच्या नावावर रक्कम जमा केली होती. मात्र ती रक्कम नंतर परत करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) श्री. दत्तात्रय बबनराव वारे, तत्कालीन उपशिक्षक तथा प्रभारी मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा वाबळेवाडी, यांना दि. २२.११.२०२१ रोजी निलंबित करण्यात आले होते. त्यांच्याविरुध्द सहाय्यक आयुक्त (चौकशी) पुणे विभाग, पुणे यांचेकडे खातेनिहाय चौकशी सुरु आहे. दरम्यान श्री. वारे, उपशिक्षक यांना दि. १०.२.२०२२ रोजी जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करण्यात आले आहे.

तसेच शाळा सुधार निधीच्या जमा रकमेसंदर्भात जिल्हा स्तरीय उच्च अधिकारी समितीने केलेल्या चौकशीच्या अनुषंगाने चौकशी समितीच्या दि.०९/०९/२०२१ च्या पत्रान्वये प्राप्त चौकशी अहवालामधील निष्कर्षानुसार जि. प. शाळा वाबळेवाडी येथे शालेय कामकाजा मध्ये अनियमितता झालेली असल्याने त्या बाबत सखोल लेखा परिक्षण करावे असे चौकशी समितीने अभिप्राय नमूद केलेले आहेत. त्यानुसार कार्यवाही करणेत येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

किनवट (जि.नांदेड) येथे शबरी आदिवासी घरकुल योजनेसाठी अर्ज करण्याच्या मुदतीत वाढ करण्याबाबत

(४५) ४०५२८ (२८-०३-२०२२). श्री.माधवराव पवार (हदगाव) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किनवट (जि.नांदेड) आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात आलेल्या शबरी आदिवासी घरकुल योजनेसाठी १०१ चे उद्दीष्ट असताना पंचायत समितीने २ हजार २०० अर्जाची विक्री केली असून सदरील अर्ज दाखल करण्याची अंतिम दिनांक २० जानेवारी, २०२२ असून त्या तारखेपर्यंत केवळ १ हजार २०० अर्ज दाखल झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील योजनेसाठी कागदपत्रांची पुर्तता करण्यासाठी अनेक अडचणी येत असल्याने आदिवासी बांधवांनी अर्ज स्वीकारण्यासाठी दिनांक वाढून मिळण्याची मागणी केल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने आदिवासीना योजनेसाठी लागणाऱ्या कागदपत्राची पुर्तता करण्यासाठी मुदत वाढ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (११-०४-२०२२) : (१) हे खरे आहे.

शबरी आदिवासी घरकुल योजनेसाठी किनवट तालुक्यासाठी १०१ चे उद्दिष्ट प्राप्त झाले होते. त्यानुसार पंचायत समिती किनवट मार्फत १६७१ अर्जाचे विनामुल्य वाटप करण्यात

आले. सदरील अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिनांक २० जानेवारी, २०२२ पर्यंत केवळ १२०५ अर्ज दाखल झाले होते.
(२) किनवट तालुक्यातील आदिवासी बांधवांकडून अर्ज स्विकारण्यासाठी दिनांक वाढवून मिळण्याच्या मागणीबाबत माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान अर्ज प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही. परंतु अशी बाब निदर्शनास आल्यास त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

इगतपुरी-त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तालुक्यातील गांवाना सिंचन क्षमतेच्या कामासाठी आदिवासी उपयोजनेंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(४६) ४१३११ (२८-०३-२०२२). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इगतपुरी-त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तालुक्यात १०० टक्के आदिवासी लोकसंख्या असलेल्या गांवाना १०१ ते ६०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या कामांना आदिवासी उपयोजनेंतर्गत निधी मिळावा यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास पर्यटन मंत्री यांना लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (२०-०४-२०२२) : (१) अशा आशयाचे निवेदन या विभागास प्राप्त झाले आहे.
(२) आदिवासी उपयोजनांतर्गत आदिवासी क्षेत्रातील मृद व जलसंधारण विभागामार्फत प्रशासकीय मान्यता प्राप्त असलेल्या १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या प्रकल्पांना आदिवासी विकास विभागामार्फत निधी देण्यात येतो. तसेच, आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत जिल्हा नियोजन समितीमार्फत जिल्हास्तरावरुन राबविण्यात येणाऱ्या ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या प्रकल्पांना निधी देण्यात येतो.

लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यास्तव मृद व जलसंधारण विभागास कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राजनगड ज्ञानपीठ भोर (जि.पुणे) येथील बंद असलेली अनुदानीत आश्रमशाळा सुरु करण्याबाबत

(४७) ४२८११ (०९-०४-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजनगड ज्ञानपीठ भोर (जि.पुणे) येथील शासनाची बंद पडलेली अनुदानीत आश्रमशाळा वर्ग सुरु करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी आदिवासी विकास मंत्री यांचेकडे दिनांक १४ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने बंद पडलेली अनुदानीत आश्रमशाळा वर्ग सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (२२-०४-२०२२) : (१) व (२)
असे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसुन येत नाही. शासनाने दि. ०७.०३.२०१३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता रद्द केलेल्या / बंद केलेल्या अनुदानित आश्रमशाळा अन्य संस्थेस चालविण्यास देण्याबाबतची कार्यपद्धती विहित केली आहे. पुणे जिल्हयातील भोर तालुक्यात या विभागाची एकही अनुदानित आश्रमशाळा नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्यातील वाण नदीवर बंधारे बांधण्याबाबत

(४८) ४३०९७ (२४-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई तालुक्यातील (जि. बीड) डोंगराळ भागातून वाण नदी वाहत असून शेती कोरडवाहू असल्याने या परिसरातील शेतीकरीता पाण्याची सुविधा नसल्याने सदर परिसरातील नागरीक ऊस तोडणीकरीता इतरत्र ठिकाणी जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी चिचखंडी ते मांडवा पठाण ते नागापूर या वाण नदीमार्गावर बंधारे बांधणे अत्यंत आवश्यक असल्याने सदरहू नदीवर बंधारे बांधण्यासाठी त्वरित सर्व्हे करण्याचे आदेश देण्यात यावे तसेच मंजूरी देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जलसंपदा मंत्री यांना दिनांक १२ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, त्याअनुषंगाने उक्त प्रकरणाची सर्वे करण्याबाबत व मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१३-०४-२०२२) : (१) होय.
(२) होय.
(३) गोदावरी खोऱ्यातील उर्वरीत मध्य गोदावरी उपखोऱ्यात वाण नदीचा समावेश आहे. या नदीवर वाण मध्यम प्रकल्प बांधण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्य जल प्राधिकरण यांचेकडून खोरे / उपखोरे यांचे पाणी नियोजनासाठी गोदावरी खोऱ्याचा पाणी अभ्यास करण्यात आलेला आहे. सदर उपखोरे हे तुटीचे उपखोरे असल्याने सद्यःस्थितीत या उपखोऱ्यात नविन प्रकल्प/बंधारे बांधण्यासाठी पाणी उपलब्ध नसल्याचे दिसून येते. त्यामुळे वाण नदीवर नव्याने

बंधारे बांधणे अशक्य होत आहे. पाणी उपलब्ध होत नसल्यामुळे नविन बॅरेजेससाठी सर्व्हे करण्यात आलेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

ठाणे जिल्ह्यातील वन हक्क दावे निकाली काढण्याबाबत

(४९) ४३५२५ (०९-०४-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यात शेकडो वनहक्क दावे प्रलंबित असून मुरबाड-२९, शहापूर-२०३, कल्याण-३ व अंबरनाथ-२१ इ. तालुक्यांतील एकूण २५६ वनहक्क दावे प्रलंबित असून वनहक्क दाव्यांवरील प्रलंबित अपिलांची संख्या मुरबाड-३०३, शहापूर-६८, कल्याण-२६ व अंबरनाथ-५६ असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन हक्क दावे निकाली काढण्याबाबत पाठपुरावा करुनही शासनाकडून कोणतीही कार्यवाही होत नसल्याने उपविभागीय कार्यालय, ठाणे येथे श्रमिक मुक्ती संघटनेच्यावतीने धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे पत्र संघटनेने जिल्हाधिकारी, ठाणे यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कल्याण, अंबरनाथ, शहापूर व मुरबाड तालुक्यातील वन हक्क दावे निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (१३-०४-२०२२) : (१) होय हे खरे आहे.
(२) श्रमिक मुक्ती संघटना, मुरबाड यांनी वनहक्कधारकांचे प्रलंबित दावे, अपिले व अन्य प्रलंबित प्रश्नांच्या निपटा-याच्या मागणीसाठी दिनांक १३.१२.२०२१ रोजी उपविभागीय कार्यालय, कल्याण यांच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले होते.
(३) कल्याण तालुक्यातील ०३ वनहक्क दाव्यांपैकी ०२ दावे जिल्हास्तरीय समितीने अमान्य केले असून १ दावा जी.पी.एस. मोजणीकरिता वनक्षेत्रपाल, कल्याण यांच्याकडे प्रलंबित आहे. तसेच प्रलंबित २६ अपिलांबाबत उपविभागीय अधिकारी, कल्याण यांचे कार्यालयात दि.२०.१२.२०२१ रोजी शिबीर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये दावेदारांनी सादर केलेले पुरावे अपिलांच्या मुळ दाव्यामध्ये समाविष्ठ करण्यात आले असून त्याबाबत उपविभागीय अधिका-यांकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

मुरबाड तालुक्यातील २९ प्रलंबित वनहक्क दाव्यांबाबत दि.०६.०१.२०२२ व दि.१३.०१.२०२२ रोजी उपविभागस्तरीय समिती कल्याण यांच्याकडून मुरबाड येथे बैठक आयोजित करून संबंधित दावेदारांना पुरावे सादर करण्याच्या सूचना देण्यात आले आहेत व काही दावे जी.पी.एस. मोजणी व गुगल इमेज साठी वनक्षेत्रपाल यांच्याकडे पाठविले आहेत. तसेच ३०३ अपिलांबाबत मुरबाड तहसिल कार्यालय, मुरबाड येथे दि.०६.०१.२०२२ रोजीच्या

शिबिरामध्ये संघटनेच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत अमान्य अपिलांची तपासणी करण्यात आली असून उर्वरीत अपिलांबाबत दि.१३.०१.२०२२ च्या शिबिरामध्ये पुरावे सादर करण्यात आले असून सदरची अपिले उपविभागस्तरीय समितीकडे प्रलंबित आहेत.

शहापूर तालुक्यातील २०३ प्रलंबित वनहक्क दाव्यापैकी ६३ दावे मान्य करण्यात आले असून १६ दावे पुरावे नसल्याने अमान्य करण्यात आले आहेत. ३३ दाव्यामध्ये त्रुटी असल्याने त्रुटीपुर्तता करणेबाबत दावेदार यांना कळविले आहे. ११ दावे जिल्हास्तरीय समितीच्या निर्णयास्तव प्रलंबित आहेत. ०३ दावे दुबार आहेत. तसेच ७७ दावे उपविभागीय समितीकडे प्रलंबित आहेत. श्रमिक मुक्ती संघटना यांना दावे पडताळणी करणेकरिता वेळ दिला असता, दि.१६.०२.२०२२ रोजी श्रमिक मुक्ती संघटनेच्या शिष्टमंडळाने प्रकरणांचा पडताळणी केली आहे. जिल्हास्तरीय समितीव्दारे ६८ अपिल दाव्यांबाबत सुनावणी घेण्यात आली असून दावेदारास उपलब्ध पुरावे सादर करणेबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

अंबरनाथ तालुक्यातील २१ दाव्यांपैकी १३ दावे जी.पी.एस. मोजणीकरिता पाठविले असून ०८ दावे दुबार आढळून आले आहेत. दुबार दाव्यांची तपासणी करून त्याबाबत जिल्हास्तरीय वनहक्क समितीव्दारे निर्णय घेण्यात येणार आहे. तसेच ५६ प्रलंबित अपिलांबाबत दिनांक २३.१२.२०२१ रोजी आयोजित शिबिरामध्ये श्रमिक मुक्ती संघटनेच्या प्रतिनिधींनी दाव्यांची तपासणी केली आहे. यामध्ये ११ दावेदारांनी पुरावे सादर केले असून ४५ दाव्यामध्ये कोणतेही पुरावे नसल्याने त्याची पडताळणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

सातरा- पोतरा (ता.जि.बीड) साठवण तलावाचे बांधकाम
तसेच कुंभारी गावाचे पुनर्वसन करण्याबाबत

(५०) ४३७२९ (२४-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातरा-पोतरा (ता.जि.बीड) साठवण तलावाच्या कामास दिनांक १२ नोव्हेंबर, २००३ रोजी मान्यता मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलावाला २००४-२००५ मध्ये कार्यारंभ आदेश असून सुध्दा गेल्या १९ वर्षा पासून सदर प्रकल्प अद्यापही अपूर्णच आहे, हे ही खरे आहे आहे काय,

(३) सल्यास, सदर तलावाचे काम पूर्ण होण्यासाठी कुंभारी गावकऱ्यानी विधानसभा, लोकसभेच्या मतदानावर बहिष्कार टाकला तसेच बरीच उपोषण आणि शासनास मोठ्या प्रमाणात निवेदन देऊन व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार मागणी करून ही कुंभारी गावचे पुनर्वसन व त्यावर आधारित सातरा-पोतरा, साठवण तलावाचे काम पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, मागील वर्षी घरे पडून लहान मोठे ६ अपघात झाले असून त्याबाबतचे पंचनामे ही प्रशासना मार्फत करण्यात आलेले असून सदरहू प्रकरणी शासन/प्रशासन यांच्याकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी दिनांक २५ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत कुंभारी गावचे पुनर्वसन व घळ भरणीचे आदेश न मिळाल्यास मंगळवार, दिनांक ०१ मार्च, २०२२ रोजी कुंभारी गावातील सर्व ग्रामस्थ जिल्हाधिकारी कार्यालय, बीड समोर आमरण उपोषण करणार असल्याचे निवेदन जिल्हाधिकारी यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने काय आढळून आले, तद्नुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१३-०४-२०२२) : (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) सदर कार्यवाही महसुल यंत्रणे मार्फत करण्यात येते.
(५) होय.
(६) मौजे कुंभारी ता.जि.बीड या पुनर्वसीत होणा-या गावाची कुटुंब यादीस दिनांक १७ जून, २०२१ रोजी जिल्हाधिकारी बीड यांनी मंजुरी देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने दिनांक २४ फेब्रुवारी, २०२२ रोजी जिल्हाधिकारी बीड यांचे अध्यक्षतेखाली भुखंड वाटप करण्यात आलेले आहे. पुनर्वसन गावठाण्यात १३५ भुखंड असून उर्वरीत कुटुंबाना स्वेच्छा सानुग्रह अनुदान वाटपाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. माहे जून, २०२२ अखेर प्रकल्पाच्या घळभरणीचे नियोजन करण्यात आले आहे.

विधान भवन :
मुंबई.

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.